# Maharashtra Mandal Chicago

# रचना

भाद्रपद शके १९३६
ऑगस्ट २०१४
वर्ष ४५ क्र. ३



Maharashtra Mandal Chicago, Inc.
(Year of Establishment: 1969)
**Website**:
http://www.mahamandalchicago.org
**Email Address for correspondence**:
president@mahamandalchicago.org
secretary@mahamandalchicago.org
Karyakarini@mahamandalchicago.org

साहित्य / मजकूर पाठविण्यासाठी संपर्क :
'रचना' संपादक - Editor - प्रसन्न जोगळेकर

Email - Rachana@mahamandalchicago.org

# रचना मुखपृष्ठ: पल्लवी राजवाडे

'रचना'चे संक्रांत, गुढीपाडवा, गणपती व दिवाळी ह्या कार्यक्रमांपूर्वी तसेच क्वचित् विशेष प्रसंगानुरूप असे वर्षातून साधारण ४– ५ अंक प्रसिध्द होतात.

साधारण १५ दिवस अगोदर संपादकांच्या हाती आलेले निवडक साहित्य नजिकच्या अंकात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील.


प्रसिध्द झालेल्या मजकूराशी संपादक वा कार्यकारिणी सहमत असतेच असे नाही.


हाती आलेल्या प्रकाशन-योग्य मजकूरात किरकोळ बदल आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.

पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेलने दिली जाईल.

महाराष्ट्र मंडळ शिकागो ( MMC) बद्दल काही उल्लेखनीय नोंदी :


- It is the first Maharashtra mandal in the United States of America, serving the local community as a non profit organization, since 1969
- It is the proud founder of (BMM) Bruhan Maharashtra Mandal, North America: http://www.bmmonline.org/
It is also the initiator of BMM newsletter – BMM Vrutta: http://www.bmmonline.org/vrutta archives
- To review Objectives and Constitution of MMC

# रहे ना रहे हम! - श्रद्धांजली

गेल्या काही महिन्यात आपल्याला सोडून गेलेले विविध क्षेत्रातले दिग्गज -



सर रिचर्ड अटनबॅरो (अभिनेता, दिग्दर्शक )

रॉबिन विल्यम्स (अभिनेता)

योग गुरु बी के एस अय्यंगार



श्री यू आर अनंतमूर्ती (ज्येष्ठ समीक्षक)

कार्टुनिस्ट प्राण ( चाचा चौधरी)

स्मिता तळवलकर ( निर्माती, दिग्दर्शक, अभिनेत्री )

श्री गोपीनाथ मुंडे ( ज्येष्ठ भाजपा नेते )



जोहरा सेहेगल ( ज्येष्ठ अभिनेत्री)


डॉ. सुशीलाराणी बाबुराव पटेल ( गायिका, अभिनेत्री, लेखिका)



श्रीम. धोंडूताई कुलकर्णी (ज्येष्ठ हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत गायिका)

आनंद मोडक ( ज्येष्ठ संगीतकार )





# या अंकात,

अध्यक्षीय - केदार नावकल.............................................4

उत्सव परीचय - गणेश चतुर्थी - संकलन  प्रसन्न जोगळेकर..............................5

काव्यवाचन वृत्तांत - सौ. उमा सु. जोगळेकर.........................................................7

आठवणी - साठवणी ( मुलाखत) -श्री शंकरराव हुपरीकर  -  सौ रश्मी चाफेकर....9

शब्दकोडे - प्रसन्न जोगळेकर .........................................................13

अक्षरधन - सौ. रेवती ओक ..................................................................14

कौतुकाचे पान - विनता कुलकर्णी ..................................................16

शब्दकोडे - उत्तर .........................................................................................17

# अध्यक्षीय

मागची वर्षी ह्याच सुमारास, विचाराचा किडा आला
एक दिवस धीर करून, अनिताला प्रश्न केला
पापण्यांची उघडझाप थांबली, "एक विचारू का तुला?"
"महाराष्ट्र मंडळाचा अध्यक्ष? तू वेडा की खुळा?"

बघता बघता वर्ष उजाडलं संक्रांतीची तारीख आली
कार्यक्रमांची सोन साखळी तेंव्हा पासून सुरू झाली
हातात हात, खांद्याला खांदा, अशी Team उभी राहिली
आणि हा उपक्रम जमेल का ही चिंताच मुळी दूर झाली

आज आपल्या मंडळाला शिकागोवासियांची साथ आहे
मंडळाच्या यशामागे त्यांचाच तर हात आहे
असाच पाठींबा मिळत रहावा अशी आशा उरात आहे
सादर करण्यात मुरलो नसलो तरी प्रयत्न मात्र जोरात आहे.

नवनवीन कार्यक्रम सदर करण्यात मुरायचंय
प्रत्येक सभागृह रसिकांनी काठोकाठ भरायचंय
अर्ध वर्ष उलटलं तरी अजून बरंच करायचंय
वेडा की खुळा, ते अजून तरी ठरायचंय!

खरोखरीच मंडळी, २०१४ वर्ष भरभर पुढे सरकतंय. या वर्षी आपण शिकागो महाराष्ट्र मंडळाची वेबसाईट रेनोवेट केली. या कामी श्री चेतन गवाणकर यांनी मोलाची मदत केली. त्यांच्या मेहेनतीला सलाम! चेतन, ग्रेट जॉब!! आता नवीन वर्षाचे, नवीन योजनांचे विचार पुढे येताहेत. उत्तमोत्तम कार्यक्रम देणे आणि शिकागोकरांसाठी नित्यनूतन उपक्रम राबवणे या हेतूने मी आणि माझी टीम प्रयत्नशील असतो आणि राहूच! तुमचा लोभ आहेच आणि तसाच राहील ही मला खात्री आहे.

-मन:पूर्वक धन्यवाद !

**-श्री केदार नावकल,**

अध्यक्ष, महाराष्ट्र मंडळ,

शिकागो.

# उत्सव परीचय - गणेश चतुर्थी

भाद्रपद शुद्ध चतुर्थी ला महाराष्ट्रामध्ये आणि आता जगभर गणेश उत्सवाची सुरुवात होते. या दिवशी सगळीकडे 'गणपती बाप्पा मोरया' चा जयघोष ऐकू येतो. 'मोरया' शब्दाचे वेगवेगळे अर्थ घेतले जातात. मोरया म्हणजे नमन, नमस्कार! काही लोकांच्या मते, 'मोरया' हा 'म्होरं या' म्हणजे 'पुढे या' याचा अपभ्रन्श. देवाला सर्वांपुढे यायची विनंती, दर्शन द्यायची विनंती म्हणजे 'मोरया'. शिवाय मोरेश्वर आणि मोरया गोसावी असे फार मोठे सत्पुरुष गणपती चे भक्त होवून गेले आहेत. त्यांच्या असाधारण भक्तीमुळेही  त्यांचे नाव देवासोबत जोडले गेले असावे.
 ' मद भक्तानां च ये भक्ता: ते मे प्रियतमा मता: ।'  अर्थात 'माझ्या भक्ताचे जे भक्त ते मला सर्वाधिक प्रिय आहेत' असे प्रभू ने गीते मध्ये म्हटलेच  आहे.

गणेश चतुर्थी ला मनुष्याने चतुर्थ वा तुर्यावस्थेच्या सिद्धीची इच्छा धरली पाहिजे. या दिवशी चंद्र पहाणे निषिद्ध आहे. चंद्र ही मनाची देवता आहे. चंद्रमा मनसो जात:। ज्याप्रमाणे चंद्र जसा वाढत-कमी होत जातो अर्थात बदलत जातो त्याप्रमाणे माणसाचं मनही चंचल असते. सिद्धी जर साधायची असेल, एखाद्या हेतुत किंवा कामात यशस्वी व्हायचे असेल तर चंचलतेचा  त्याग करायला हवा. ही गोष्ट कदाचित यात गर्भित आहे.

कुठल्याही शुभ कार्याची सुरुवात गणपती पूजनाने होते. गजाननाचे रूप बाकी देवतांसारखे नाही. धड मानवाचे, डोके हत्तीचे, पोट सुटलेले! तसे बघायला गेले तर भगवान शंकराला बाल गणेशाचे शीर कापल्यानंतर परत तसेच जोडता आले असते पण त्या बालकाला हत्तीचे शीर बसवण्यात आले. पण पुराणातल्या गोष्टींमध्ये बरेच गर्भित अर्थ दडलेले आहेत.
गणपती अर्थात गणांचा अधिपती अर्थात नेता याला हत्तीचीच बुद्धी असायला हवी. हा 'गुण-पति' असायला हवा. याच्याकडे बाह्य-सौंदर्य नसले तरी आंतरिक सौंदर्य असायला हवे. हत्ती या प्राण्याला बुद्धीमान समजले जाते. समाजाला योग्य मार्गाने नॆणारा नेता बुद्धीमानच असायला हवा. हत्ती चे कान सुपासारखे मोठे असतात. 'सार सार को ग्रही लई और थोथा देई उडाये' अर्थात महत्वाचे ऐकून, सारासार विचार करून महत्त्व नसलेल्या गोष्टी सोडून द्याव्यात. मोठे कान हे उत्तम श्रवणभक्ती चेही  द्योतक आहेत.

गजाननाचे डोळे बारीक आहेत. सूक्ष्म दृष्टीचे ते प्रतीक आहेत. मानवानेही आपली दृष्टी सूक्ष्म ठेवून अर्थात जीवनाच्या ध्येयात एकाग्र होवून नकळत घुसणाऱ्या दोषाना अडवले पाहिजे.

गजाननाचे मोठे नाक (सोंड) दूरदर्शी पणा दाखवते. हत्ती ची सोंड सुई देखील उचलू शकते. समाजाच्या नेत्याकडे दूरदृष्टी आणि लहानात लहान पण महत्वाची गोष्ट समजून घ्यायची क्षमता हवी.  गणपती चे मोठे पोट सर्वांचे अपराध सामावून घेते असा समज आहे. त्याचे लहान पाय सुचवितात की आयुष्यात उताविळपणा उपयोगाचा नाही. त्याचे वाहन उंदीर आहे जे सिंह, गरुड नंदी यांसारखे विशाल नाही. ते गणेशाला घरा-घरात पोचवू शकते. महापुरुषांची साधने अशीच लहान आणि नम्र हवीत जेणेकरून ती त्याना लोकांच्या हृदयापर्यंत पोचवू शकतील. प्रिय बनवू शकतील. उंदीर फुंकर घालून चावतो असा समज आहे. त्याप्रमाणे एखाद्याला शिक्षा  देताना बुद्धीमान नेता गोडपणे समजही देतो. शिक्षा भोगणाऱ्या ला आधी पटवतो आणि स्वत: हून शिक्षा स्वीकार करायला भाग पाडतो.
गणपती ला दुर्वा प्रिय आहेत. ज्यांचे लौकिकार्थाने काही मूल्य नाही अशा गोष्टी स्वीकारून त्याने त्यांचे महत्त्व वाढवले आहे. समाजात प्रत्येकाला महत्त्व आहे हेच याचे प्रतीक आहे.

अनंत चतुर्दशी ला गजाननाचे विसर्जन होते. आपल्याला जी गोष्ट अत्यंत प्रिय आहे अशा गोष्टीचा त्याग करता आला पहिजे. थोडक्यात कुठल्याही गोष्टीची आसक्ती बाळगता कामा नये हीच गोष्ट यातून शिकावयास मिळते. साकार रूपाचे विसर्जन करून निराकार ईश्वराचा स्वीकार करायला आपण शिकले पहिजे.

लोकमान्य टिळकांनी ज्या हेतू ने सार्वजनिक गणेशोत्सवाचा आरंभ केला ते विसरता कामा नये. समाजात एकजूट हवी. एकवाक्यता हवी. आपापसांत प्रेम हवे. एकमेकांच्या घरी जाउन आरत्या म्हणणे, गजाननाच्या मिरवणुकीत सामील होणे  हे याचेच प्रतीक आहे.

असा हा सुंदर सण ! गणपती बाप्पा म्होरं या! पुढल्या वर्षी लवकर या!

-संकलन - प्रसन्न जोगळेकर

# काव्यवाचन - वृत्तांत

'जे न देखे रवि , ते देखे कवि' असे कवींबद्दल म्हटले जाते. म्हणूनच कवितांविषयी ज्यांना आसक्ती, रसास्वाद्वृत्ती, सहवेदना आहेत अशा रसिकांसाठी नेपरवील चे डॉ. मिलिंद वेलणकर यांनी आपल्या वास्तूत दि. ८ ऑगस्ट २०१४ रोजी रात्रौ काव्यवाचनाचा आगळा वेगळा सहसा न होणारा बहारदार कार्यक्रम आयोजित केला होता. काव्यवाचनासाठी विशिष्ट विषय न ठेवता दर्जेदार कवींच्या दोन कविता त्याच्या लय, वृत्त, रचनेसह प्रत्ययकारी वाचाव्यात जेणेकरून सर्वांना त्यांचा आस्वाद घेता येईल असा आग्रह केला होता.
कार्यक्रमासाठी वाचक, श्रोते, सादरकर्ते मोठ्या संख्येने आस्थेने उपस्थित होते.
प्रारंभी डॉ. वेलणकरानी कार्यक्रमाचे प्रयोजन सांगितले व आपल्याला आवडणार्या 'कवी ग्रेस' यांच्या अनेकाना क्लिष्ट वाटणाऱ्या एका कवितेचे मुखोद्गत सादरीकरण केले आणि सर्वांचे कौतुक मिळविले.

श्री मिलिंद पानट यांनी मंगेश पाडगावकरांची 'कळते पण वळत नाही' आणि श्री संजय उपाध्ये यांची 'मन करारे प्रसन्न' या कविता वाचल्या. त्यांचे काव्यवाचन एका सराईत कवी इतकेच उत्कट होते . त्यावरून त्यांचे कविमन अनुभवास आले.

श्री प्रणील वैद्य यांनी आरती प्रभूंची एक सुंदर कविता खूपच प्रभावी पध्दती ने सादर केली.

श्री रवि जोशी यांनी एका बापाचे जे सलील कुलकर्णी नी सुंदर संगीत देउन अजरामर केले आहे असे मनोगत 'दमलेल्या बाबाची कहाणी ' सादर केले.

सौ. विद्या जोशी यांनी अमेरिकेचे जीवन हे भारतातल्या जीवनापेक्षा किती व कसे वेगळे आहे हे स्वानुभवातून लिहिलेले काव्य वाचले .

श्री सत्यजित खारकर यांनी नवीन कविता आणि गीते लिहिणारे श्री दासू वैद्य ह्यांच्या कविता उत्कट पणे वाचल्या.

सौ उमा जोगळेकर यांनी भारतीय स्वातंत्र्याचा महिना ऑगस्ट म्हणून ज्ञानपीठ विजेते कुसुमाग्रज यांची 'स्वातंत्र्य देवतेची विनवणी ' आणि सर्वांचे आवडते बालकवी यांसारख्या निसर्गकवींच्या प्रतिभेतून कल्पिलेली सदाबहार 'फ़ुलराणी' ही कविता वाचली.

श्री प्रसन्न जोगळेकर यांनी श्री शंकर वैद्य यांची 'छत्री' आणि कुसुमाग्रजांची 'गाभारा' या कविता सादर केल्या.

या सर्वावर कळस चढविला कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शिकागोचे आपले कविवर्य श्री सुहास तांबे यानी! त्यानी त्यांच्या स्वत:च्या कविता नवनवीन तसेच लोकप्रिय गाण्याच्या चाली लावून नवीन तंत्रज्ञान 'कराओके' पद्दतीने सर्वांना पडद्यावर दाखवून म्हणून दाखवल्या. पडद्यावर शब्द उमटताच सर्व रसिकांनी तांबे यांच्याबरोबर कविता म्हणत त्याना  छान साथ केली.

संपूच नये असे वाटणाऱ्या या कार्यक्रमाचे आयोजक डॉ. श्री वेलणकर व त्यांच्या पत्नी भारती  यांना शतश:  धन्यवाद!

-सौ. उमा सु. जोगळेकर

# आठवणी - साठवणी ( मुलाखत)

( शिकागो महाराष्ट्र मंडळाचे माजी अध्यक्ष श्री. शंकरराव हुपरीकर यांच्याशी सौ. रश्मी चाफेकर

यांनी केलेली बातचीत)

**रश्मी :** मला सुरवातीला तुमच्या विषयी जाणून घ्यायला आवडेल .

**शंकरराव :** माझा जन्म बेळगाव जिल्ह्यात पूर्वी रामदुर्ग नावच संस्थान होत तिथे झाला. म्याट्रिक पर्यंतच शिक्षण तिथे झाल्यानंतर सांगली ,तिथून पुणे . पुण्याला B.Sc ,M.Sc केल . तिथून मुंबईहून १९६४ मध्ये P.Hd केल. १९६६मध्ये मला अमेरिकेत येण्याची संधी मिळाली .तेव्हापासून शिकागो मधेच आहे.

**रश्मी:** महाराष्ट्र मंडळाची सुरुवात कशी झाली?

**शंकरराव:** आम्ही ६६ साली येथे आलो तेव्हा शरद गोडबोले इथे होते, ते मराठी लोकांना बोलावून दिवाळी वगैरे साजरी करायचे. त्यावेळी येथे पीस कॉर्प्स साठी जाणारी टीम तयार होत होती. त्यांना मराठी शिकवण्यासाठी लोक जमत होते. त्यात अनिता गोडबोले, सरोज ओक ,अलका लागवणकर ,कीर्ती गव्हाणकर ह्या सगळ्याजणी मराठी शिकवायच्या . त्यात जिमी कार्टर ह्यांच्या आई पण त्यांच्या विद्यार्थिनी होत्या . त्या दिवाळीला इथे मोठ फंक्शन झाल होत. तर आम्ही ६६-६८ ह्या कालावधीत मराठी लोक नेहमी भेटायचो,गम्मत करायचो. त्यानंतर ६८ च्या नोव्हेंबर मध्ये दत्तात्रय आणि सुनंदा मणेरीकर, शरद आणि अनिता गोडबोले ,अशोक आणि हेमा शेंडे ,शंकर आणि जया हुपरीकर ,यशवंत आणि मुक्ता कुलकर्णी , मारुती आणि सुमन बोराडे ,अरविंद आणि सुनीला कुलकर्णी ,जयवंत आणि सुमन नाडकर्णी ,श्रीनिवास आणि सुनीती जोशी ,मनोहर आणि सुनंदा कामत ह्या १० कुटुंबांनी investment club सुरु केला . १९६९ ला त्याच्याच एका गणपतीच्या मीटिंग मध्ये महाराष्ट्र मंडळ सुरु करायचा निर्णय घेतला. आणि त्या वर्षीच्या दिवाळीला प्रस्ताव मंजूर झाला,त्या दिवशी पुढच्या वर्षीच्या निवडणुका झाल्या . मणेरीकर पहिले अध्यक्ष झाले आणि महाराष्ट्र मंडळाला सुरुवात झाली . १९७० च्या पाडव्याला महाराष्ट्र मंडळाची स्थापना झाली . हे अमेरिकेतल पाहिलं registered महाराष्ट्र मंडळ आहे .

**रश्मी :** तुम्ही महाराष्ट् मंडळाचे अध्यक्ष कधी झालात?

**शंकरराव:** त्यावेळी आमच वर्ष जानेवारी ते डिसेंबर असं नसून पाडवा ते पाडवा असं चलायचं . मी ७४ च्या पाड्व्या पासून ते ७५ च्या पाड्व्या पर्यंत अध्यक्ष होतो.

**रश्मी:** जयाताई कधी अध्यक्ष होत्या?

**शंकरराव :** नाही, जयश्री २ वर्ष vice president होती. तिनी "रचना" , कॅनडाच्या एकता मासिकाच्या आधी सुरु केलं. त्याचा पहिला अंक आणि पहिला दिवाळी अंक हा तिनी एडीट करून स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिला होता. आम्ही अभिमानानी असं म्हणू शकतो कि आपलं मंडळ हे उत्तर अमेरिकेतील pioneer आणि trend setter आहे.

**रश्मी:** तेव्हा तुम्ही कुठल्या प्रकारच्या कार्यक्रमाना प्राधान्य द्यायचा ?

**शंकरराव:** आम्ही पहिल्या पासून जे कार्यक्रम सुरु केले, संक्रांत, पाडवा,गणपती, दिवाळी ते अजूनही सुरु आहेत. १९७१ साली आम्ही नाटकाचा कार्यक्रम सुरु केला . १७ एप्रिल १९७१ साली इथे पहिले नाटक " प्रेमा तुझा रंग कसा " सादर झाल . हे अमेरिकेतल पहिल full length नाटक आहे. हे नाटक मीच direct केल होत आणि कामही केल होत . १९७१ ते २००३ पर्यंत , मध्ये एक दोन वर्ष सोडता प्रत्येक वर्षी नाटक केल आहे.

**रश्मी:** त्या वेळी तुम्ही कुठल्या प्रकारचे कार्यक्रम करायचा ?

**शंकरराव :** एक कार्यक्रम हा स्थानिक मुलांसाठी असायचा. १९७४ साली रामदास कामत ह्यांचा कार्यक्रम आम्ही केला होता. त्या गणपतीत आम्ही "कट्यार काळजात घुसली" ह्या नाटकातल्या १२ रागांच्या मालिकेवर कार्यक्रम केला होता. शेखर जोशीच्या आई लीलाताई जोशी ह्यांनी त्याला चाली लावल्या, त्याच्या वडिलांनी पेटी वाजवली ,अरविंद देवभक्त ह्यांनी तबला वाजवला. हेमा शेंडे,शेखर जोशी ,सुनीती काणे हे गायक आणि मी कविराज असा आम्ही दीड तासाचा कार्यक्रम केला. हा कार्यक्रम माझ्यासाठी सगळ्यात आनंददायक होता . त्याच वर्षी सदानंद जोशी ह्यांचा "मी अत्रे बोलतोय" आणि सावरकरांच्या नकला हा कार्यक्रम पण केला होता.

**रश्मी:** तुमच्या दोघांची हि बृहन्महाराष्ट्र मंडळात खूप सहभाग होता, त्याविषयी आम्हाला माहिती जाणून घ्यायला आवडेल .

**शंकरराव :** १९८० मध्ये विष्णू वैद्य ह्यांच्या डोक्यात एक कल्पना आली की एक umbrella organization असावं . मग विष्णू वैद्य ,शरद गोडबोले आणि आम्ही खूप मिटींग्स घेतल्या आणि१ जानेवारी १९८१ मध्ये आम्ही सहा जणांनी, विष्णू आणि प्रभा वैद्य,शरद आणि अनिता गोडबोले आणि शंकर आणि जया हुपरीकर, ह्यांनी मिळून स्थापन केलेली हि संस्था आहे. जयानी वृत्तपत्राची जबाबदारी घेतली. मी पदाधिकारी नव्हतो. विष्णू वैद्य ,शरद गोडबोले आणि जया हुपरीकर हे treasurer, president आणि secretary ह्या पदांवर होते. ही संस्था इतकी वर्ष टिकून राहिली आहे ही अतिशय चांगली गोष्ट आहे ,आणि ही संस्था conventions मुळे टिकून अहे. मी सुरुवातीला convention च्या बाबतीत एव्हडा उत्साही नव्हतो. पण ते करावं अस इतरांच मत होत. आणि आमच्या सहा जणांचं अस होत कि एकदा ठरवलं कि मागे फिरायचं नाही . तर पहिल convention १९८४ मध्ये शिकागो झालं. ह्यासाठी

कुठल्याही खर्चाची अपेक्षा नव्हती. आम्ही स्वतःच्या पदरचे पैसे घातले .ह्या convention ला २५०-३०० लोक आले होते. convention तोट्यात गेलं नाही पण सुरवातीला धाकधूक होती. त्या नंतर १९८५ मध्ये मुळगुंद म्हणून होते ,त्यांनी टोरांटो मध्ये convention करण्याची सुपारी दिली. त्यावेळी ७०० लोक आली होती. आता मात्र तुमच्या पेक्षा आम्ही चांगल करतो हि चढाओढ वाढली आहे जी आमच्या डोक्यात नव्हती आणि मला स्वतःला भारतातून कलाकार का आणतात ते कळत नाही. इथे खूप talent आहे. इथल्या लोकांसाठी हे मंडळ स्थापन केलेलं आहे आणि त्यांना संधी मिळाली पाहिजे हे माझं वैयक्तिक मत आहे.

**रश्मी:** शिकागो मध्ये स्थानिक कलाकारांना वाव द्यायचा ह्याला तुमच प्राधान्य होत त्याविषयी थोडं सांगाल का?

**शंकरराव:** मी नाटक सुरु केलं कारण मला खाज होती. (ग्रामीण भाषा वापरल्या बद्दल sorry). आणि महाराष्ट्र मंडळ स्थापन झाल्यावर दुसऱ्या दिवशी मणेरीकर म्हणाले "तुमची इच्छा आहे तर पुढच्या वर्षी नाटक करूया" आणि तेव्हा पासून नाटक हा आपल्या महाराष्ट्र मंडळाचा एक मोठा हिस्सा आहे. तेव्हा $३ म्हणून लोक कटकट करायचे पण नाटकं successful होत गेली,लोकांना आवडायला लागली. अनेक जणांनी तर सांगितलं कि आम्ही भारतात नाटक बघत नव्हतो पण तुमच्या साठी यायला लागलो.

**रश्मी:** तेव्हा तुम्हाला कलाकार मिळायला अवघड व्हायचं?

**शंकरराव :** तेव्हा इथे कलाकार नव्हते. अनुपमा येई पर्यंत कलाकार नव्हते. नावं मागवली कि त्यातले suitable कलाकार घ्यायचे. मी रामचंद्र वर्दे ह्यांचा शिष्य आहे. मी toning ला महत्व द्यायचो. माझ्या मनाप्रमाणे टोनिंग आल्याशिवाय नाटक successful व्हायचं नाहि. पण तुम्हाला इंटरेस्ट पाहिजे. दर वर्षी नवीन लोक यायचे ,त्यांना ट्रेन करायचं,ज्यांनी रंगभूमीवर कधी पाउल टाकलं नाही अश्या १०० च्या वर लोकांना ट्रेन केल आहे. त्यांना इंटरेस्ट होता ,मेहनत करायची इच्छा होती. जर कोणी कमी पडत असले तर वैयक्तिक ट्रेनिंग पण द्यायचो. हे सगळ करण्या मागे एकच इच्छा होती कि नाटक successful व्हावं.

**रश्मी:** प्रचंड dedicationनी तुम्ही हे काम केलं आहे.

**शंकरराव:** कारण त्यामध्ये जो आनंद मिळायचा ,लोकांच्या टाळ्या मिळाल्या नंतर जी भावना असते… त्यामुळे आपला उत्साह द्विगुणीत होतो.

**रश्मी:** तुम्ही स्थापन केलेलं महाराष्ट मंडळ आणि त्याचा झालेला विस्तार ह्याविषयी तुमचं काय मत आहे?

**शंकरराव:** आम्हाला आनंद आहे. जे लोक ३ dollarच तिकीट घ्यायला मागेपुढे बघायचे ते आता १००-२०० dollar देतात, याच आश्चर्य वाटत.


**रश्मी:** तुमच्या दृष्टीनी महाराष्ट्र मंडळाचा इतक्या वर्षांचा प्रवास कसा झाला आहे?

**शंकरराव:** खूप छान झाला आहे. पाच वर्षापर्यंत आम्ही पूर्णपणे involved होतो. आता डोळ्यांच्या त्रासामुळे आम्ही येऊ शकत नाहि. पण आमच्या शुभेच्छा कायम सगळ्यांच्या पाठीशी आहेत. इतक्या वर्षांमध्ये शिकागो मध्ये दुसरं महाराष्ट्र मंडळ निर्माण झालं नाही ह्याचा खूप आनंद आहे. आमची ही बेबी आहे, ती नवीन लोकांच्या ताब्यात दिली आहे, तिचा त्यांनी सांभाळ करावा अशी आमची इच्छा आहे.

**रश्मी:** आमच्या नवीन पिढीची वाटचाल सुलभ होण्यासाठी तुम्ही काय सांगाल?

**शंकरराव:** मी काय सांगणार? सगळे सुबुद्ध आहेत. सगळ्यांच्या वेगळ्या कल्पना आहेत. आम्ही आमच्या कल्पना कोणावरही लादू इच्छित नाहि. फक्त ह्याच्यामध्ये खंड न पडता मंडळ असंच पुढे चालू रहावं आणि आपली संस्था आदर्श व्हावी एव्हढीच इच्छा आहे.

# शब्दकोडे




| आडवे | उभे |
|---|---|
| १. अत्यंत श्रीमंत व्यक्ती | १. लग्नाचा मुलगा |
| २. वस्तू | ११. नाजूक |
| ३. एक प्रकारचे मंत्र. आरत्यांनंतर हे म्हटले जातात | १२. रहिवासी, नगरात रहाणारे लोक. |
| ४. त्रास | १३. शास्त्रीय संगीतातील एक राग |
| ५. एकत्र रहाण्याचे ठिकाण | १४. ___ आणि मंडळी. यांची कोळीगीते प्रसिद्ध आहेत. |
| ६. उपासाच्या दिवशी याचे पदार्थ होतात | १५. जिचे डोळे हरणा सारखे आहेत अशी मुलगी/स्त्री. |
| ७. कुसुमाग्रजांच्या एका प्रसिद्ध कवितेचे नाव | १६. देवांपेक्षा कमी दर्जा असलेले पण नैसर्गिक संपत्तीचे संरक्षक |
| ८. एक जीवघेणा रोग | १७. मृत्यू ची देवता |
| ९. ठरवून दिलेले | १८. पाणी |
| १०. एक रास | |

# "अक्षर धन”


लंपनला भेटायला मला उशीरच झाला. कसा कोणास ठावूक पण नजरेस पडलाच नाही. म्हणजे पुस्तकांचा फडशा पडणारं माझा घर मग "लंपन" कसा बरं आमच्या घरात आला नाही? ऐशीचं दशक म्हणजे पुल, वपु आणि शन्नांच. त्यात स्वामी, तुंबाडचे खोत आणि मृत्यंजय यांचं गंभीर अस्तित्व. रारंगढांगच्या तर आकंठ प्रेमात. अश्या पुस्तक वेड्या घरात लंपन आला तो मी चाळीशी गाठल्यावर. तो पर्यंत कोसला आणि शाळा यांनी शाळेतल्या बेंचवर जोड्यांची नावं कोरतात तसं कोरीवकाम मनावर केलेलं अशातच "वनवास" मधून लंपन घरी आला. आला म्हणजे त्याला आणून सोडला, माझ्या एका मैत्रिणीने. लंपन,सुमी, बाबुराव, आजी, संशोधक आजोबा,सुंदर आई, अभ्यासू बाबा, मनी नव्हे सगळी पात्रच घरी मुक्कामाला आली. आमच्या इनमिन तीन माणसांच्या घरात ह्या सगळ्या कलाकारांची मस्त वर्णी लागली. माझ्या नकळत मी सुद्धा लंपनशी कधी मैत्री केली कळलं नाही. प्रकाश संतांचा लंपन, पुलंची शऱ्या शरी ते अंतू बर्वा, शन्नांची अनेक पात्रे , वपुंची घराघरात डोकावणारी माणसे, गोनिदांच्या दुर्गाभ्रमन्तितले सहकारी, तुंबाडचे खोत मधले अर्कट, जी.एनची गूढ माणसे, मतकरींची मर्मकता, कोसला आणि शाळा मधले अतितरल विश्व , सानिया आणि गौरी देशपांडेंच्या समजतील अश्या नायक नायिका, आशा बगे यांनी दिलेले सुखद अनुभव, मंगला गोडबोलेंची हसरी झुळूक, द मा आणि शंकर पाटलांचा गावरान बाज, फास्टर फेणे- गोट्या -चिंगी यांनी रंगवलेले बालविश्व,चि विं नि दिलेला निखळ आनंद; अश्या या झळाळत्या "अक्षर धनाची" मोजमाप कुठला तराजू करेल? पुस्तकं आणि त्यातले प्रत्येक पात्र संदर्भासकट मला पाठ आहे. "शहाणी सकाळ" हि गोष्ट मी नेहेमी कथाकथन स्पर्धेत म्हणत असे. पुलंनी संपन्न केलेलं तारकादळ तर आपण आजही अनुभवतो आहोत. बटाट्याची चाळ आणि तिथले रहिवासी आपलेच आहेत अशी भावना होते. पांढऱ्यावर काळ्या अक्षरांची जादू काय असते ते कळायला जसं उत्तम वाचक असायला लागतं तसंच त्या त्या वेळेला दर्जेदार साहित्यही उपलब्ध असावं लागतं. भाषा कुठलीही असो ती अधिक सुस्वरूप होते तिच्या वाचकांच्यामुळे. पिढ्यानपिढ्या चालत आलेले सणवार मोठ्या कसोशीने पार पडणारे आपण हल्ली हे "अक्षरधन" पुढच्या पिढीकडे सुपूर्द करायचं विसरतो आहोत. तांत्रिक जगात खरंतर हि सर्व मोट ई-रिडर वर बांधणं किती सोप्प आहे नाही? मी मराठीत शिकले म्हणून मला मराठीची गोडी पण इंग्रजी पुस्तकांशी सुद्धा माझी मैत्री आहे. माझ्या दृष्टीने वाचन म्हणजे पंढरीची वारी आहे. निखळ आनंद देणारी एक सात्विक यात्रा. आज का वारीची आठवण झाली असा प्रश्न पडला असेल तर सध्या सोशल मिडियावर तुम्हाला आवडलेली १० पुस्तकं कोणती असा एक प्रश्न येतो आहे. त्याला उत्तर म्हणून यादी करायला बसले तर कुठून सुरुवात करू ते कळेनाच. "चौघीजणी" शिवाय माझी यादी सुरूच होऊ शकत नाही, शांताबाईंनी काय कमाल अनुवाद केला आहे. बरीचशी अनुवादित पुस्तकं मी आधी मराठीत आणि नंतर इंग्रजीत वाचली त्यात अग्रेसर आहे संजय भास्कर जोशींनी केलेला "ॅक चर इन द राय" चा अत्योत्कृष्ट अनुवाद. याच्या जोडीला तोत्तोचान, चीपर बाय द डझन, लिटील हाउस ऑन द बिग फार्म हि पुस्तकं माझ्या हृदयाच्या अत्यंत आवडत्या कप्प्यात दडली आहेत, मन उदास झालं कि तो आवडता कप्पा मी

हळूच उघडते आणि उदासीनता कुठल्याकुठे पळून जाते. मोठ्यांनी लहानांची पुस्तकं वाचायची नाहीत असा काही नियम नाही, मला अजूनही "देनिसच्या गोष्टी आणि सुंदर वासिलीसा" हि अनुवादित रशियन पुस्तकं चहा पिता पिता वाचायला आवडतात. प्रत्येकाची यादी निरनिराळी आहे आणि असायलाच हवी कारण जसा प्रत्येक माणूस निराळा तशी त्याची आवडही निराळी. आता ज्युलिअस व्हर्नच्या सगळ्या पुस्तकांची ओळख "किशोर" मासिकातून झाली होती. माझी आई बहुतेक पुस्तकं तिच्या शाळेच्या लायब्ररीतून आणायची. ती शाळेतून घरी येई पर्यंत मला धीर नसायचा, आणि एकदा का हातात पुस्तक पडलं कि ते थेट संपेपर्यंत मी हवेत! काळ बदलल्याची एक खूण म्हणजे हल्ली असा पोटातून अगदी आतून आनंद होईल असं काही वाचायला मिळत नाही. विकृत आणि क्रौर्य असलेलं काही काळजाचा ठाव घेऊ शकत नाही. अर्थात मी चुकीची असेन, मला नवीन थेट मनाला हात घालणारं काही सापडलं नसेल. पण जुन्यात मन अधिक रमतं हेही तितकंच खरं आहे. ह्या लेखाचा पंक्तीप्रपंच कुठलीही क्रमवार यादी करणं नाहीये तर हे माझ्याकडे असलेल्या "अक्षरधनाचं" सिंहावलोकन आहे!

-रेवती ओक

# कौतुकाचे पान

शिकागो महाराष्ट्र मंडळाच्या रचना मासिकाच्या माजी संपादिका सौ. विनता कुलकर्णी यांचे 'क्षितीज पश्चिमेचे' हे पुस्तक ग्रंथाली प्रकाशन मुंबई तर्फे बीएमेम कन्वेन्शन २०१३ मध्ये प्रकाशित झाले होते.




नुकताच त्यांच्या पुस्तकाचे परीक्षण करणारा लेख ग्रंथाली च्या रुचि या मासिकात प्रकाशित झाला आहे.

त्याचा दुवा - (पान ३७)
http://www.granthali.com/ruchi_archive/Shabd_Ruchi_July_2014.pdf

आणखीन एक पुस्तक परीक्षण श्री सुहास फडके ( माजी संपादक - महाराष्ट्र टाईम्स) यांनी मार्च मध्ये लिहिले होते त्याचाही दुवा -

http://blogs.maharashtratimes.indiatimes.com/freehit/entry/marathi-nri-book

**पुढील लेखनासाठी विनता ना खूप खूप शुभेच्छा!**

# शब्दकोडे - उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ न | व | ११ को | ट | १२ ना | रा | १३ य | ण |
| व | | म | | ग | | म | |
| र | | ल | | री | | २ न | ग |
| ३ दे | १४ वे | | | ४ क | ट | क | ट |
| ५ व | सा | १५ ह | त | | | ल्या | |
| | ६ व | री | | १६ य | | ण | |
| | ७ क | णा | | ८ क्ष | १७ य | | १८ नी |
| ९ आ | र | क्षि | त | | १० म | क | र |